**महाराष्ट्र शासन**
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग, नागपूर
कार्यालय :- धनवटे चेंम्बर्स (अँनेक्स) सिताबर्डी नागपूर-४४००१२
**फोन न** ०७१२-२५२४५४९, २५२३३५४ फॅक्स नं. ०७१२-२५३३४५०
**ईमेल आयडी** - djrngp2011@gmail.com, djr_ngp@rediffmail.com, djrngp@rediffmail.com

जा.क्र.नियमन/नाजिमस/कलम८८/चौकशी/१५५७/२०१७

दि.०४/०५/२०१७

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत आदेश

**वाचले** :- १. या कार्यालयाचे आदेश क्र.विसनि/विनि/जिमस बँ नाग/क.८८/५७०५/०२, दि.१३/०५/२००२
२. प्राधिकृत अधिकारी कलम ८८ यांनी सादर केलेला चौकशी अहवाल क्र.प्राधी अधि/कलम८८/ जिमसबँक नाग/चौकशी अहवाल/१५३०/२०१३, दि.२८/११/२०१३
३. मा.मंत्री (सहकार), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे अपील अर्ज क्र.८९१/२०१३ मधील आदेश दि.१४/०६/२०१४
४. या कार्यालयाचे आदेश क्र.विसनि/नियमन/नाजिमस/कलम८८/१३७९/२०१४, दि.१६/०६/२०१४
५. मा.उच्च न्यायालयाने दिवाणी अर्ज क्र.२७५/२०१७ मध्ये जनहित याचिका क्र.२५/२०१४ या मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २/०३/२०१७
६. या कार्यालयाचे आदेश क्र.नियमन/नाजिमस/कलम८८/चौकशी/१५४२/२०१७,दि.३/०५/२०१७

उपरोक्त वाचले क्रमांक २, दि.२८.११.२०१३ मधील आरोप क्र.१,२,५,६ व ७ ची फेरचौकशी करण्याकरीता उपरोक्त वाचले क्रमांक ६ अन्वये श्री किशोर देशपांडे, माजी सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, रा. नागपूर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सदहू प्राधिकृत अधिकारी यांचे नांवास मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी जनहित याचिका क्र.२५/२०१४ मध्ये दि.४.०५.२०१७ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान असहमती दर्शवून अन्य सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची नियुक्ती करावी असे मत प्रदर्शित केले आहे. त्यामुळे, उक्त चौकशी प्रकरणी उपरोक्त संदर्भिय क्रं.६, दि.०३.०५.२०१७ रोजीच्या आदेशांत अंशतः बदल करुन अन्य चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे:-

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार तसेच महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना क्रमांक सीएसएल/१४९३/११६२/ सीआर- ४७/९५ -सी दि.०७ ऑगष्ट १९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी प्रवीण वानखेडे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर याव्दारे नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर या बँकेत झालेल्या

..२..

Scanned by CamScanner

गैरव्यवहाराची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्याकरीता श्री.एस. डी. मोहोड, सेवानिवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश, रा.नागपूर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. श्री. एस. डी. मोहोड यांनी, चौकशी अहवाल दिनांक २८/११/२०१३ मधील नियम ७२(३) अंतर्गत दोषारोप पत्रातील आरोप क्र.१, २, ५, ६ व ७ च्या अनुषंगाने **(सोबतचे परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद मुद्दे)** फेरचौकशी संदर्भात दिनांक १६/६/२०१४ चे आदेशान्वये माजी प्राधिकृत अधिकारी श्री खरबडे यांनी पुर्ण केलेल्या चौकशीच्या टप्प्यानंतरची प्रक्रीया, सदर्हू चौकशी संदर्भात वेळोवेळी मा.उच्च न्यायालय तथा सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या दिशा-निर्देशानुसार, पुर्ण करावी व चौकशी अहवाल ३ महिन्याचे आंत सादर करावा. तसेच प्राधिकृत अधिकारी यांनी कलम ८८ (२) अन्वये सदर्हू चौकशीचा खर्च निश्चित करुन तो खर्च कोणाकडून किती वसुल करावा याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करावा. सदर्हू आदेश मी माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ०४/०५/२०१७ रोजी पारीत केला आहे.

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

**(प्रवीण वानखेडे)**
**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, नागपूर**

**प्रत :-**

१. श्री.एस डी. मोहोड, सेवानिवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश, पत्ता- प्लॉट नं.५०/ए, तिसरा मजला, चिंतामणी अपार्टमेंट, हिल रोड, गोकुलपेठ, नागपूर
२. अॅड. (डॉ.) श्री. सुरेंद्र खरबडे, माजी प्राधिकृत अधिकारी कलम ८८ यांना सुचित करण्यात येते की, त्यांना चौकशी खर्चाकरीता अदा करण्यात आलेल्या अॅडव्हान्स राशीपैकी खर्च झाल्यानंतर उरलेली रक्कम जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांच्या पी. एल. आय. खात्यात जमा करावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी प्राधिकृत अधिकाऱ्यास चौकशी कामी सहकार्य करावे. तथा प्राधिकृत अधिकारी यांना चौकशी कक्ष, कार्यालय अधिक्षक स्तरावरचा अधिकारी, लघुलेखक/टंकलेखक, लिपिक, सहाय्यक व संगणक संच, चौकशी अधिकारी यांना चौकशी संदर्भात जाणे-येणे करीता वाहनचालकासह वाहन व इतर अनुषंगिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.
४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी प्राधिकृत अधिकारी यांना चौकशी खर्चापोटी अग्रीम रक्कम रुपये १,००,०००/- तात्काळ अदा करावे.
५. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर (लेखापरिक्षण) सस्नेह
६. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था,नागपूर

**प्रत माहितीकरीता सविनय सादर**
मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, नागपूर**

Scanned by CamScanner

## परिशिष्ट क्रमांक १

प्राधिकृत अधिकारी यांनी दिनांक ४/०१/२००३ रोजी दिलेल्या आरोपपत्राशी संबंधीत परिशिष्टातील फेरचौकशी करावयाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | आरोप | रक्कम | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | मुद्दा क्र.१ - नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर चे माजी संचालक मंडळांनी शासकीय प्रतिभूती मध्ये कायदा नियम, पोटनियम, भारतीय रिझर्व्ह बँकेचे मार्गदर्शक नावांचा उल्लंघन करुन बँकेच्या निधीची गुंतवणूक केली मात्र सदरच्या गुंतवणीतील निधी बँकेत परत न मिळाल्यामुळे बँकेचे झालेले नुकसान | रु.१४९,८२,७५,०००/- | बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, माजी सरव्यवस्थापक आणि संचालक मंडळातील निवडून आलेले सर्व संचालक हे वैयक्तिक व सामुहीकरित्या जबाबदार ठरत आहेत. |
| २ | मुद्दा क्र.२ - बँकेचे तत्कालीन संचालक मंडळाने शासकीय प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक करते वेळेला बँकेला माजी संचालक मंडळांनी तथा माजी सरव्यवस्थापक यांनी या संबंधातील प्रचलीत नियम, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सुचना इत्यांदीचे पालन न करुन अवैधरित्या केलेली गुंतवणूक व त्याव्दारे केलेले अपकार्य | प्रत्येकी रु. १०००/- | जबाबदार व्यक्ती बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, माजी सरव्यवस्थापक आणि संचालक मंडळातील निवडून आलेले सर्व संचालक हे वैयक्तिक व सामुहीकरित्या जबाबदार ठरत आहेत. |
| ३ | मुद्दा क्र.५- संचालक मंडळामध्ये मिटींग न घेता कोणत्याही अटींची व शर्तींची पुर्तता न करता दि.१४/०९/२००२ चे सर्क्युलर ठरावाव्दारे युरो डिस्कव्हरी कंपनीला अनियमितपणे दिलेले रु.४०.०० कोटी कर्ज व त्याव्दारे केलेले अपकार्य | प्रत्येकी रु. १०००/- | १. माजी अध्यक्ष श्री सुनिल केदार<br>२. सौ. आशाताई महाजन<br>३. श्री शामराव धवड<br>४. सौ कुसुमताई किंमतकर<br>५. श्री मोरबाजी निमजे<br>६. श्री रमेशकुमार निमजे<br>७.श्री संतोष चोरे<br>हे जबाबदार आहे. |
| ४ | मुद्दा क्र.६ - भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करुन बँकेने नॉन एस एल आर प्रतिभुती दुय्यम बाजारातून विकत घेतल्या त्यावर बँकेला २३५.५० लाख प्रिमियम भरावे लागले, अशा प्रकारे बँकेच्या निधीचा गैरवापर करुन बँकेला नुकसान पोहचविलेले आहे. | रु.२३५.५० लक्ष | बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, माजी सरव्यवस्थापक आणि संचालक मंडळातील निवडून आलेले सर्व संचालक हे वैयक्तिक व सामुहीकरित्या जबाबदार ठरत आहेत. |
| ५ | मुद्दा क्र.७ - बँकेने दिनांक ३१/०३/२००१ अखेरच्या नफा तोटा पत्रकामध्ये योग्य त्या तरतुदी न करता चुकीचा नफा दाखवून नियमांचे केलेले उल्लंघन व भागधारकाची केलेली दिशाभूल त्याव्दारे झालेले अपकार्य | प्रत्येकी रु.१०००/- | बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, माजी सरव्यवस्थापक आणि संचालक मंडळातील निवडून आलेले सर्व संचालक हे वैयक्तिक व सामुहीकरित्या जबाबदार ठरत आहेत. |

सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था, नागपूर

Scanned by CamScanner